# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक ३०.०८.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि २९/०८/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ४३ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन २३,०००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि ३०/०८/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकाविरूध्द २८३ मोवाका अन्वये एकुण ०३ ठिकाणी कार्यवाही करण्यात आली.

**अपघात :—**दिनांक ३०/०८/२०२२ रोजी फिर्यादी रविकुमार सोपान कबाडे रा सुकळी खु ता सेनगाव जि हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे नर्सी ना.येथे कलम २७९,३०४अ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.२८.०८.२२ रोजी चे २३:०० वा ते दि २९.०८.२२ चे ०४.०० वा चे सु मौ घोटादेवी पाटीजवळ यातील मयत नामे शिवाजी कबाडे वय २७ रा सुकळी खु हा रोडने जात असतांना त्यास कोणत्यातरी अज्ञात वाहन चालकाने त्याचे वाहन भरधाव वेगात व हयगयीने चालवुन मयतास ठोस देवुन गंभीर जखमी करून त्याचे मरणास कारणीभुत झाला म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात नर्सी ना.पोलीस तपास करित आहेत.

दिनांक ३०/०८/२०२२ रोजी फिर्यादी तोलाजी नारायण मुधळ रा भाटेगाव ता कळमनुरी जि हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे आ.बाळापुर येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.०९.०८.२२ रोजी चे सायंकाळी १८:०० वा चे सु वरूड तांडा राष्ट्रीय महामार्गावर यातील क्रुझर जिप क्र एमएच२६ एफ २९५२ चा चालक नाव गाव माहीत नाही च्या चालकाने त्याच्या ताब्यातील क्रुझर जिप भरधाव वेगात हलगर्जी व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचा मुलगा चालवीत असलेली हिरो डिलक्स कंपनीची मोसा क्र एमएच ३८ एए ०५५९ ला पाठीमागुन जोराची धडक देवुन गंभीर जखमी केले व पायास जबर मार लागुन फॅक्चर केला म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात आ.बाळापुर पोलीस तपास करित आहेत.